**नि.दि.दा.क्र. ८०/२०१५ नि. क्र. ८०**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्रीमती एम.डी.भंमवानी यांच्या तर्फे शपथेवर सुरु**

३२. मी अग्रवाल भवन येथे ज्वाइंट सेक्रेटरी या पदावर कार्यरत आहे. मी सन २००७ ते २०१०, २०१५ पासून आजतागायत ज्वाइंट सेक्रेटरी म्हणून कार्यरत आहे. आता मला दाव्यातील पान क्र.११ दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, पान क्र.११ वर माझी सही नाही. आता मला दाव्यातील पान क्र.१३ दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर सोलमन अफरमेशनवर राम एच. अग्रवाल यांची सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये व्हेरीफीकेशन कॉलम नाही. हे म्हणणे खरे नाही की, राम अग्रवाल यांनी मला प्रस्तुतच्या दाव्यात पुरावा देण्याचे अधिकार दिले नाही. मी पुन्हा सांगतो की राम अग्रवाल यांनी मला प्रस्तुतच्या दाव्यात पुरावा देण्याचे अधिकार दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला वादी ट्रस्टच्या अध्यक्षाने सुद्धा या दाव्यात पुरावा देण्याचा अधिकार दिलेला नाही. सध्या वादी ट्रस्टचे अध्यक्ष अजय रुपनारायण अग्रवाल आहे. त्यांच्यापूर्वी संतोष अग्रवाल हे अध्यक्ष होते.

**प्रतिवादींच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी (राजेश र. शेरेकर)

दिनांक –३०/०१/२०२५ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्रीमती एम.डी.भंमवानी यांच्या तर्फे शपथेवर सुरु**

३३. दाव्यातील मजकुराबाबत मला व्यक्तीशः माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.२५ मध्ये नि.क्र.३९ ते ६० अश्या निशाण्या तसेच आर्टीकल अ ते ज (Article A to J) पर्यंत दिलेल्या आहेत, त्या माझ्यासमक्ष देण्यात आलेल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रामधील मजकुर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे पुराव्याचे शपथपत्र दि.१३.०९.२०२२ रोजी न्यायालयात दाखल केले होते, माझा पुरावा त्यानंतर घेण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३९ ते ६० व आर्टीकल अ ते ज हे कागदपत्र मी स्वतः शाबीत केलेले नाही.

३४. वादी संस्थेने प्रतिवादीच्या वडीलांना सन १९६७ मध्ये दोन ब्लॉक भाड्याने दिले होते. त्यावेळी मी वादी संस्थेचा विश्वस्त (Trusty) नव्हतो. सन १९६७ मध्ये माझा जन्म झालेला नव्हता. सन १९६७ मध्ये वादी संस्थेने प्रतिवादीच्या वडीलांना दोन ब्लॉक भाड्याने दिले होते हे दाखविणारा कुठलाही कागद मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. साक्षदार स्वतःहून सांगतो की त्यावेळी तोंडी व्यवहार झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीच्या भाड्याचा महिना १ तारखेला सुरू होऊन ३० तारखेला संपतो. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही ब्लॉकचे भाडे दरमहा प्रत्येकी रु.५०/– होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नियमीतपणे प्रत्येकी रु.५०/– भाडे देतात. प्रतिवादी नियमीतपणे भाडे देत नव्हते हे दाखविणारा पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

३५. वादी संस्थेने यापूर्वी प्रतिवादी विरुद्ध कधी दावा दाखल केला होता याची मला माहिती नाही. आता मला यादी निशाणी १०८ सोबत अनुक्रमांक २३ ला दाखल रेवेन्यु केस नं.४०/ए–७१(२)/८५–८६ ची प्रत दाखविण्यात आली. सदर केस बाबत मला माहिती नाही. वादी संस्थेचे पूर्वी अडव्होकेट गोपाल शर्मा असल्याबाबत मला माहिती नाही. अनुक्रमांक २३ वर अडव्होकेट गोपाल शर्मा यांची सही असल्याचे मला माहिती नाही. सदर दस्तास ओळखीकरिता आर्टीकल के (Article k) देण्यात येते. त्या केसमध्ये गैरअर्जदाराकडून जबाब दाखल करण्यात आला होता याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोतीराम जनरल स्टोअर्स हे प्रतिवादी पूर्वी त्यांचे वडील नथ्थुलालजी पारवानी यांना दिले होते. नथ्थुलालजी पारवानी मय्यत झाले आहे याबाबत मला माहिती आहे, परंतु त्यांच्या मयताची तारीख मला माहिती नाही.

त्याकेसमध्ये गैरअर्जदाराच्या वारसांना पक्षकार केले नसल्यामुळे ते प्रकरण खारीज झाले होते याबाबत मला माहिती नाही.

३६. आता मला यादी निशाणी १०२ सोबत अनुक्रमांक १ वर दाखल सन १९८५ ते २००३ या कालावधीचे वादी संस्थेचे ठराव बुक दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, या बुकाच्या पान क्र.अ वर वादी संस्थेच्या १९९१ ते २००३ या कालावधीच्या ठरावाची माहिती असल्याचे लिहीलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर बुकाच्या वरती सदर बुकाचा कालावधी १९८५ ते २००३ असा लिहीलेला आहे. सदर बुकाचे कवर साक्षदाराला उलटतपासादरम्यान दाखविल्यामुळे त्याला **नि.क्र.११०** देण्यात येते. सदर बुकातील पान क्र.अ साक्षदाराला उलटतपासादरम्यान दाखविल्यामुळे त्याला **नि.क्र.१११** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, पान क्र.१ वर पहिली सभा दि.११.०९.१९९१ रोजी झाल्याचे नमुद आहे. सदर बुकातील पान क्र.१ साक्षदाराला उलटतपासादरम्यान दाखविल्यामुळेपान त्यास **नि.क्र.११२** देण्यात येते. त्यावर माझी सही नाही. त्यावेळी मी वादी संस्थेचा विश्वस्त नव्हतो.

३७. हे मला माहित नाही की, सन १९८५–८६ मध्ये वादी संस्थेने प्रतिवादी कडून जाणून बूझून भाडे घेणे बंद केले होते. रेवेन्यु केस खारीज झाल्यानंतर प्रतिवादीने ३ वर्षाचे भाडे भरले होते याबाबत मला माहिती नाही. वादी संस्थेची इमारत कधी बांधण्यात आली होती याची मला माहिती नाही. माझ्यासमक्ष वादी संस्थेची इमारत पाडून पुन्हा नव्याने बांधण्यात आलेली नाही. सन १९८५–८६ मध्ये वादी संस्थेची इमारत पडक्या स्थितीत (Dilapidated Condition) होती याची मला माहिती नाही. वादी संस्थेच्या इमारतीचा नकाशा मी वादी संस्थेमध्ये विचारुन दाखल करु शकतो. वादी संस्थेची इमारत सन १९५०–५१ मध्ये बांधण्यात आली होती याची मला माहिती नाही.

३८. सन २००७ मध्ये वादी संस्थेने प्रतिवादीविरुद्ध दावा दाखल केल्याबाबत मला माहिती नाही. आता मला यादी निशाणी १०८ सोबत अनुक्रमांक ४ वर दाखल दि.२९.०३.२००७ रोजी वादी संस्थेने प्रतिवादीला दिलेल्या नोटीसची स्थळ प्रत पोस्टाच्या पावतीसह दाखविली. त्यावर माझ्या वकिलांची सही आहे. त्यावर सचिव म्हणून कुणाची सही आहे हे मला माहिती नाही. सदर नोटीस साक्षदाराला उलटतपासादरम्यान दाखविल्यामुळे त्यास **नि.क्र.११३** देण्यात येते. नि.क्र.११३ चे नोटीसला प्रतिवादीने दि.२३.०४.२००७ रोजी जबाब दिल्याबाबत मला माहिती नाही. दि.२३.०४.२००७ रोजीच्या जबाबाला वादी संस्थेच्या वकिलांनी दि.०६.०५.२००७ रोजी पुन्हा जबाब दिल्याचे मला माहिती नाही. दि.२३.०४.२००७ व दि.०६.०५.२००७ रोजीचे जबाब

साक्षदाराला उलटतपासादरम्यान दाखविल्यामुळे त्यास ओळखीकरीता आर्टीकल एल व एम (Article L and M) देण्यात येते.

**मध्यानाची वेळ झाल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी (राजेश र. शेरेकर)

दिनांक –२७/०३/२०२५ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.

**उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्रीमती एम.डी.भंमवानी**

**यांच्या तर्फे शपथेवर सुरु**

३९. ज्या नकाश्या द्वारे वाद जागेवर इमारत उभी करण्यात आली होती तो नकाशा मी आज रोजी माझ्या सोबत आणलेला नाही. हे मला माहित नाही की, १९८५–८६ नंतर वाद जागेवर कोणतीही इमारत बांधण्यात आली होती किंवा नाही. हे मला माहित नाही की १९५०–५१ साली जी इमारत उभी करण्यात आली होती ती इमारत पुर्णपणे तोडून नविन इमारत उभी करण्यात आली होती किंवा कसे. हे मला माहित नाही की, संस्थेच्या रेज्युलूशन बुकमध्ये जुनी इमारत तोडून नविन इमारत बांधण्याबाबतचे कोणते ठराव होते किंवा कसे. हे मला माहिती नाही की १९९१ ते २००३ पर्यंत मनी आर्डर किंवा डिमांड ड्रफ्ट द्वारे किराया देण्यात आला होता याबाबत रसीद अभिलेखावर आहे किंवा कसे.

४०. आता मला अभिलेखावरील नि.क्र.१०८ वरील दस्त क्रमांक ८ ते १० दाखविण्यात आला. हे मला माहित नाही की, सदरील दस्त हा पोस्टल रेसिप्ट व डिमांड ड्राफ्ट व बँकेची पावती आहे किंवा कसे. (साक्षदारास सदरहू दस्त उलटतपासात दाखविण्यात आल्यामुळे त्यास नि.क्र.११४ ते ११७ देण्यात येते) (Learned Advocate Shri. R.I. Agrawal objected to exhibit documents on the ground that said document are denied by witness. Exhibition of documents and proof of documents are two different things. If some document is exhibited he does not mean that said documents is proved. Hence document Exh. No. 114 to 117 are exhibited only for identification purpose by keeping their proof and procedure of proof open )

४१. आता मला अभिलेखावरील नि.क्र.१०८ वरील दस्त क्रमांक १३ दाखविण्यात आला. (साक्षदारास सदरहू दस्त उलटतपासात दाखविण्यात आल्यामुळे त्यास नि.क्र.११८ देण्यात येते). (Learned Advocate Shri. R.I. Agrawal objected to exhibit documents on the ground that said document is denied by witness. Exhibition of documents and proof of documents are two different things. If some document is exhibited he does not mean that said documents is proved. Hence document Exh. No. 118 is exhibited only

for identification purpose by keeping their proof and procedure of proof open )हे मला माहित नाही की संस्थेने असे कोणते पत्र दिले होते किंवा कसे.

**पुढील उलटतपास प्रतिवादीचे वकीलांच्या तोंडी विनंतीनुसार पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी (क्यु.आर. सय्यद)

दिनांक –२६/०६/२०२५ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.

**पुढील उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्रीमती एम.डी.भंमवानी यांच्या तर्फे शपथेवर सुरु**

४२. हे मला माहित नाही की, २००७ साली वादीने सारख्याच मुद्यांवर दावा दाखल केला होता किंवा कसे. मी २००७ साली सह सचिव होतो. हे म्हणणे खरे आहे की नोव्हेंबर १९९१ ते डीसेंबर २००३ पर्यंत भाडा दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने जे काही मनी आर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट पाठविले होते ते आम्ही घेण्यास इंकार केले होते. साक्षदार स्वतःहून सांगतो की आम्हाला कोणतेही मनी आर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट मिळाले नव्हते. हे मला माहिती नाही की दि.१२.०६.२००७ रोजी वादीला नोटीसचे उत्तर देण्यात आले होते. (साक्षदारास नोटीस दि.१२.०६.२००७ दाखविण्यात आले त्यास **नि.क्र.११८** देण्यात येते व तसेच पोस्ट पावतीस **नि.क्र.११९** देण्यात येते.) हे म्हणणे खरे नाही की दि.२८.०५.२००७ रोजी प्रतिवादीने रु.४,८००/– रुपयाचे मनी आर्डर दि.१०.०४.२००७ लेटर सोबत पाठविले होते. हे मला माहिती नाही की दस्तावर मोतीराम जनरल स्टोअर्सच्या प्रोप्रायटरची सही आहे.

४३. हे म्हणणे खरे आहे की २००७ साली रवि गोयल अग्रवाल भवन सोसायटीचे सेक्रेटरी होते. दस्तावर प्रतिवादीची सही आहे किंवा कसे हे मला माहित नाही सोबत पोस्टल रिसीप्ट व डिडीची छायांकित प्रत आहे किंवा कसे. त्यास **आर्टीकल–एन १ व २** देण्यात येते. हे मला माहिती नाही की सन १९९१ पासून २००४ पर्यंत चे मनी ऑर्डर घेण्यास इंकार करण्यात आले होते किंवा कसे. (त्यास **आर्टीकल–ओ १ ते ५** देण्यात येते.) हे म्हणणे खरे आहे की वादीने रेवेन्यू प्रोसिडींग क्र.४०–ए–७१(२)१९८५–८६ रेन्ट कंट्रोल कोर्ट यांच्या समोर (कलम क्लास १३(३)(V) व (VI) अन्वये) दाखल केला होता. (त्यास **नि.क्र.१२०** देण्यात येते.) हे मला माहिती नाही की ज्यावेळी प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आला होता त्यावेळी विधीज्ञ गोपाल शर्मा हे काम पाहायचे. हे मला माहिती नाही की त्या दाव्यामध्ये प्रतिवादीने जबाब दाखल केला होता किंवा कसे. (त्यास **आर्टीकल पी** देण्यात येते).

४४. हे म्हणणे खरे आहे की मोतीराम जनरल स्टोअर्सचे मालक नथ्थुलाल पारवानी होते. हे मला माहिती नाही की ते २५.०९.१९९० रोजी मरण पावले. हे मला माहिती नाही की प्रतिवादीने रेन्ट कंट्रोल कोर्टासमोर प्रोसिडींग अबेटची पुर्सीस दाखल केली होती किंवा कसे. हे मला माहिती नाही की दि.२९.०६.१९९२ रोजी प्रतिवादीने प्रोसिडींग खारीज करावी म्हणून अर्ज दाखल केला होता व दि.०७.०८.१९९२ रोजी प्रोसिडींग अबेट करण्याबाबतची अर्जी दाखल केली होती किंवा कसे. (त्यास **आर्टीकल क्यू** देण्यात येते.)

४५. हे मला माहिती नाही की दि.२३.०५.१९८० रोजी विधीज्ञ वी.आर.देवपुजारी यांनी नोटीस दिली होती किंवा कसे. (त्यास **आर्टीकल–आर १ ते ३** देण्यात येते.) हे म्हणणे खरे आहे की दि.११.०३.२००७ रोजी अग्रवाल भवन सोसायटी यांनी दावा दाखल संदर्भात ठराव घेतला होता. त्यास **नि.क्र.१२१** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की दावा दाखल संदर्भात ठराव पास केला होता.

**पुढील उलटतपास प्रतिवादीचे वकीलांच्या तोंडी विनंतीनुसार पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी (क्यु.आर. सय्यद)

दिनांक –०६/१२/२०२५ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.